# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)


संदर्भ क्र. विविमं/२०२५-२६/४७ मुदतवाढ दिनांक : २५/०६/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य / मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी सलंग्न
असलेली सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये राबविलेल्या योजनांचे अहवाल पाठविण्यास मुदत वाढ....
संदर्भ क्र. :- या विभागाचे पत्र क्र. विविमं/२०२५-२६/११, दि. १२/०६/२०२६ चे पत्र.

महोदय / महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी सलंग्न असलेली सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विद्यार्थी विकास मंडळाच्या राबविलेल्या प्रत्येक / सर्व (विद्यापीठामार्फत अर्थसहाय्य प्राप्त तसेच विद्यापीठाकडून अर्थसहाय्य प्राप्त नसलेल्या परंतु महविद्यालय निधीतून राबविलेल्या) योजना व उपक्रम निहाय अहवाल रूपी माहिती ऑनलाईन पद्धतीने मूल्यांकनासाठी मंगळवार दिनांक २३ जून २०२६ विद्यार्थी विकास मंडळाकडे पाठविण्याबाबत कळविण्यात आले होते.

उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अधिन राहूनच आपल्या महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्था यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये राबविलेल्या उपक्रमांचा सविस्तर अहवाल पाठविण्याची **बुधवार दिनांक ८ जुलै २०२६ पर्यंत मुदत वाढविण्यात** येत आहे.

तरी आपल्या महाविद्यालयात / परिसंस्थेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विद्यार्थी विकास मंडळाच्या राबविलेल्या प्रत्येक / सर्व (विद्यापीठामार्फत अर्थसहाय्य प्राप्त तसेच विद्यापीठाकडून अर्थसहाय्य प्राप्त नसलेल्या परंतु महविद्यालय निधीतून राबविलेल्या) योजना व उपक्रम निहाय अहवाल रूपी माहिती **(दोन फोटो (प्रत्येकी २ MB पर्यंत) १. विद्यार्थी सहभाग असलेला २. स्टेज वरील अथवा वृत्त पत्रात प्रसारित बातमी)** खाली दिलेल्या लिंकवर ऑनलाईन पद्धतीने (www.unipune.ac.in – BOD Online – Login - students development – menu – Scheme Book) या लिंकवर **बुधवार दिनांक ८ जुलै २०२६ या वाढीव मुदतीत भरणे व अपलोड** करणेबाबत संबंधिताना सूचित करावे. कळावे, हि विनंती.

(डॉ. सविता कुलकर्णी )
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ